महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा)
राज्य प्रकल्प संचालनालय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
युनिट क्र. २, १८ वा माळा, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर - १, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५
ई मेल- spdrusamah@gmail.com दुरध्वनी क्र. ०२२-४५१६९५५२


क्र.राप्रसं/रुसा/२०२४-२५/६७१ दिनांक -१४ऑक्टोबर, २०२४

# कार्यालयीन मंजूरी आदेश

**विषय :-प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM USHA) या योजनेअंतर्गत Drawing Limit देण्यास मंजूरी मिळणेबाबत.**

**संदर्भ :- १. दि.०२/०२/२०२४ रोजी झालेल्या दुसऱ्या प्रकल्प मंजूरी मंडळाची बैठक**
**२. कार्यालयीन मंजूर टिपणी दि.०६/०९/२०२४**

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान या योजनेचा पुढील टप्पा प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) या नावाने सुरु करण्यात आला . PM USHA या योजनेंतर्गत विविध घटकांखाली एकूण ६८१ प्रस्ताव केंद्र शासनास पोर्टलद्वारे सादर करण्यात आले होते. दि.१८/०१/२०२४ पहिल्या व दि.०२/०२/२०२४ रोजी पार पडलेल्या दुसऱ्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या (PAB) बैठकीमध्ये राज्यातील ५८ प्रकल्पांस मंजूरी देण्यात आली आहे. सदर प्रकल्प मंजूरी मंडळाच्या (PAB) बैठकीचे इतिवृत्त दि.१७/०२/२०२४ व ०८/०३/२०२४ रोजी शिक्षा मंत्रालय,भारत सरकार यांचेकडून निर्गमित करण्यात आले होते.

त्यास अनुसरुन प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अतंर्गत Grants to Strengthen College या घटकांतर्गत ३ महाविद्यालयांना Drawing Limit देण्यास प्रस्तावित आहे.

**आदेश-**

PM USHA योजनेत घटक ३ अंतर्गत Grants to Strengthen College या घटकातंर्गत केंद्र शासनाचा हिस्सा व राज्य शासनाचा हिस्सा खालील तक्त्यात नमुद केलेल्या विद्यापीठांना खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून Drawing Limit देण्यात येत आहे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे नाव | मंजूर निधी | Drawing Limit | | एकूण Drawing Limit |
|---|---|---|---|---|---|
| | | | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | |
| | | | | | |
| १ | Chme Societys Bhonsala Military College, Arts, Science & Commerce, Nashik | ५,००,००,००० | ३०,००,००० | २०,००,००० | ५०,००,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | Sonopant Dandekar Arts College S Apte Commerce and M H Mehta Science College, Palghar | ५,००,००,००० | ३०,००,००० | २०,००,००० | ५०,००,००० |
| ३ | Progressive Educational Societys Modern College of Arts, Science & Commerce, Pune | ५,००,००,००० | ३०,००,००० | २०,००,००० | ५०,००,००० |
| | Total | १५,००,००,००० | ९०,००,००० | ६०,००,००० | १,५०,००,००० |

अटी व शर्ती-

१. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) निधीसाठी भारतीय स्टेट बँकेत उघडलेल्या स्वतंत्र Zero Balance Subsidiary Account खात्यामध्ये दुसरा कोणताही व्यवहार करु नये.

२. कंत्राटदारांना/पुरवठादारांना रकमा आगाऊ स्वरुपात (Advance)देता येणार नाहीत.

३. केंद्र शासनाच्या दि. २३ मार्च, २०२१ च्या आदेशान्वये केंद्र सरकार पुरस्कृत योजनांसाठी राज्यांना निधी वितरित आणि वितरित करण्यात आलेल्या निधीच्या उपयोगावर देखरेख ठेवण्यासाठी सुधारित प्रक्रिया आमलात आणली आहे. त्या अनुषंगाने Drawing Limit महाविद्यालयांना PFMS द्वारे Zero Balance Subsidairy Account मध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

४. सदर Drawing Limit , या कार्यालयाच्या Single Nodal Account (SNA) account मधील शिल्लक निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५. शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.१(१३)PFMS/FCD/२०२०, दि. १६.०३.२०२२ च्या आदेशानुसार PFMS Portal मध्ये वजाती करण्यात येणारा Tax/Statutory deduction यांचा भरणा Holding Account द्वारा करण्यात यावा.

६. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) योजनेअंतर्गत साधनसामुग्री व उपकरणे खरेदी प्रक्रिया वित्तीय अधिकार नियम पुस्तिका दि. १७ एप्रिल, २०१५ च्या तरतुदी तसेच शासनाने उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करावी तसेच दि. २४ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये GEM Portal वरुन करण्यात यावी.

७. ज्या साधन सामुग्री व उपकरणे शासनाच्या GEM Portal वर उपलब्ध नसल्यास अथवा पुरवठादार त्याठिकाणी पुरवठा करण्यास तयार नसेल तर अशा साधन सामुग्री व उपकरणे दि. ०१/१२/२०१६ रोजी शासन निर्णयातील

विहित कार्यपद्धतीचा व तरतुदींचा अवलंब करून शासन निर्णय २४/०८/२०१७ आणि ०७/११/२०२१ अन्वये खरेदी प्रक्रिया पार पाडावी.

८. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) च्या मार्गदर्शक सूचनांनुसार नवीन बांधकाम, नुतनीकरण, उपकरण खरेदी व सॉफ्ट घटक यासाठी निर्धारित केलेल्या निधीच्या प्रमाणाच्या वर खर्च करु नये.

९. खरेदी, नवीन बांधकाम किंवा नूतनीकरण करण्यात येणाऱ्या बाबीवर प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) योजनेचा लोगो तसेच "रुसाच्या सौजन्याने" असे लिहून प्रथम दर्शनी दिसेल अशा स्वरुपात लावणे अनिवार्य आहे.

१०. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) देण्यात आलेल्या Drawing Limit च्या अनुषगाने महाविद्यालयांनी विहित कालावधीमध्ये खर्च पूर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. महाविद्यालयांना निधीच्या खर्चाची तसेच कामांची माहिती Fund Status Report मध्ये भरुन दर आठवडयाच्या सोमवारी, तसेच झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Form१२C या नमुन्यात) दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत तपशीलवार खर्चाच्या माहितीसह या संचालनालयास सादर करावे.

११. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे संनियंत्रण खालील नमुद केलेली प्रकल्प सनियंत्रण समिती करेल.

    १. प्राचार्य
    २. प्राध्यापक
    ३. रुसा समन्वयक
    ४. प्रबंधक
    ५. रुसा कार्यालयाचे प्रतिनिधी
    ६. विद्यार्थी प्रतिनिधी

१२. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) योजने अंतर्गत प्राप्त निधीचे लेखापरीक्षण (Internal Audit) CAG मान्यता प्राप्त Empaneled सनदी लेखापाल यांचेकडून करुन अहवालाची प्रत राज्य प्रकल्प संचालनालयास पाठविण्यात यावी. तसेच त्यासाठी रोखवही (Cash Book) स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी.

१३. महाविद्यालयांनी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरिक्षण, महालेखापाल, महाराष्ट्र-१ किंवा प्रकरणपरत्वे महाराष्ट्र-२ नागपूर यांनी सदर कामा करीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणी करीता उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

१४. महाविद्यालयांनी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखा परीक्षण अहवाल इ. या संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना तपासणीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

१५. महाविद्यालयांनी पुरवठादारास/कंत्राटदारास अदा करावयाची देयकाची रक्कम PFMS द्वारे त्यांच्या बँक खात्यात वर्ग करावी. रोखीने व्यवहार करु नये.

१६. महाविद्यालयांनी नवीन बांधकाम/नुतनीकरणाचे काम Energy Conservation Building Code २०१७, Bureau of Energy Efficiency, Ministry of Power, Government of India मार्गदर्शकतत्वानुसार पार पाडावे.

१७. महाविद्यालयाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या सोयी सुविधा, पुस्तके, उपकरणे नजदीकच्या महाविद्यालयांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

१८. महाविद्यालयांनी खरेदी केलेले उपकरणे लवकरात लवकर स्थापित करुन ती विद्यार्थ्यांच्या वापरासाठी खुली करावीत.

१९. महाविद्यालयांनी पुरवठा आदेशानुसारच खरेदी झाली आहे काय याची खात्री करावी तसेच प्राप्त झालेल्या वस्तू या सुव्यवस्थित आहेत का याची खात्री व संबंधीत पुरवठादारास योग्यत्या दराने TDS व GST वजा करुनच देयक अदा करण्यात यावे.

२०. महाविद्यालयांनी खरेदी करताना निविदा संकेतस्थळ व वर्तमानपत्रे यामध्ये प्रसिध्द करावी.

२१. महाविद्यालयांनी खरेदी केलेल्या उपकरणांची जड वस्तूसंग्रह नोंद वहीत (Serial Number wise) नोंद घेऊन त्याची नोंद उपकरणावर ही घ्यावी.

२२. सविस्तर प्रकल्प अहवाला बाहेरील करण्यात आलेला खर्च अनुज्ञेय असणार नाही.

२३. महाविद्यालयांनी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची तसेच उपक्रमांची माहिती शिक्षक तसेच विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

२४. निर्माण करण्यात आलेल्या सुविधांची तसेच खरेदी केलेल्या उपकरणांची देखभाल करणेची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

२५. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन आदेश / परिपत्रक/ नियम यांचे काटकोरपणे पालन करुन सदर निधी खर्च करणे बंधनकारक राहील. शासन आदेश / परिपत्रक/ नियम यांचे पालन होत नाही असे आढळून आल्यास महाविद्यालयावर होणाऱ्या कार्यवाहीस ते स्वत: जबाबदार असतील.

(राहूल म्हात्रे)
राज्य प्रकल्प सहसंचालक
राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान(रुसा)

State Project Joint Director
State Project Directorate
Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan
Mumbai

प्रति-

१. प्राचार्य, संबधीत महाविद्यालये

प्रत माहितीस्तव -

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान
३. उपसंचालक(वित्त), राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान
४. निवड नस्ती(रुसा)